# बृहन्मुंबई महानगरपालिका
## आपत्कालीन नियंत्रण विभाग
## पावसाळी परिस्थितीचा अहवाल
### ४ जूलै २०१८ ते ५ जूलै २०१८ सकाळी ८:०० ते ८:०० (२४ तास)

१. पाऊस:

| स्थळ | २४ तासांचा पाऊस (मिमी) | ४ जूलै २०१८ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | वार्षिक सरासरी पाऊस (मिमी) | २०१८ पावसाची टक्केवारी | ४ जूलै २०१७ मधील पाऊस (२४ तासांतील) (मिमी) | ४ जूलै २०१७ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | २०१७ टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कुलाबा | ३२.४ | ९७६.१ | २२३४ | ४३.६९% | १.२ | ५७७.३ | २६.४३% |
| सांताक्रुझ | ४२.५ | १०८६.९ | २५१५ | ४३.२२% | ६.६ | ६९४.८ | २८.३२% |

१. मनपाच्या स्वयंचलित केंद्रांवर नोंदविण्यात आलेला सरासरी पाऊस:

| विभाग | २४ तासांचा पाऊस (मिमी) | ४ जूलै २०१८ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | शहर व उपनगरातील सरासरी पाऊस (मिमी) | मुंबईत झालेला एकुण सरासरी पाऊस (२३१९) (मिमी) |
|---|---|---|---|---|
| शहर | २७.४० | ७९२.८१ | ३६.३०% | ३७.९५% |
| पूर्व उपनगरे | ४४.०७ | ९८९.७२ | ३७.६५% | |
| पश्चिम उपनगरे | ४२.४४ | ८५७.३६ | | |

२. तापमान:

| स्थळ | कमाल | किमान |
|---|---|---|
| कुलाबा | २८.२ | २४ |
| सांताक्रुझ | ३०.६ | २३.६ |

३. समुद्राची भरती:

| दिनांक | भरतीची वेळ | लाटांची उंची | दिनांक | ओहोटीची वेळ | लाटांची उंची |
|---|---|---|---|---|---|
| ०५.०७.२०१८ | सायंकाळी ४:३३ | ३.८८ मी. | ०५.०७.२०१८ | रात्रौ १०:५५ | १.७८ मी. |
| ०६.०७.२०१८ | पहाटे ५:१२ | ३.२३ मी. | ०६.०७.२०१८ | सकाळी १०:३८ | १.९७ मी. |
| ०६.०७.२०१८ | सायंकाळी ५:१६ | ३.७५ मी. | ०६.०७.२०१८ | रात्रौ ११:५५ | १.६८ मी. |

४. हवामान अंदाज: कुलाबा वेधशाळेने पुढिल २४ तासांकरिता वर्तविलेल्या अंदाजानुसार मुंबई शहर व उपनगरात अधूनमधुन पावसाच्या सरी पडत रहाण्याची तर काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पावसाच्या सरी पडण्याची शक्यता आहे.

५. **पाणी साचणे** : निरंक

६. **घर पडणे** : शहरात २, पूर्व उपनगरात ३ व पश्चिम उपनगरात १ अशा एकुण ६ ठिकाणी इमारतीचा/ भिंतीचा काही भाग पडल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या, सदर तक्रारी संबंधित यंत्रणाना व विभागांना कळविण्यात आल्या आहेत. मार नाही.

७. **दरड कोसळणे**: निरंक

८. **शॉर्टसर्किट**: शहरात ४, पुर्व उपनगरात ३ व पश्चिम उपनगरात ५ अशा एकुण १२ ठिकाणी शॉर्टसर्किट होण्याची घटना घडल्या असुन संबंधित यंत्रणांना कळविण्यात आल्या आहेत. मार नाही.

९. **झाडे पडण्याच्या तक्रारी**: शहरात १०, पुर्व उपनगरात १३ व पश्चिम उपनगरात १६ अशा एकूण ३९ ठिकाणी झाडे पडण्याच्या तक्रारी नागरीकांकडुन प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधित विभागांना पडताळणीसाठी व पुढिल कार्यवाहीसाठी कळविण्यात आल्या आहेत. मार नाही.

१०. **वाहतुक व्यवस्था : (आज सकाळी ९:०० वा. प्राप्त माहितीनुसार)**

- **पश्चिम रेल्वे** : वाहतुक सुरळीत सुरु आहे
- **मध्य रेल्वे** : वाहतुक सुरळीत सुरु आहे
- **हार्बर रेल्वे** : वाहतुक सुरळीत सुरु आहे
- **बीईएसटी** : वाहतुक सुरळीत सुरु आहे

१. **विशेष माहिती**:**१)** दिनांक ०४.०७.२०१८ रोजी दुपारी १.५० वा. अग्निशमन नियंत्रण कक्षाकडून कॅडल रोड, मगदुमबाबा दर्गा जवळ माहीम (पश्चिम) येथे एक अनोळखी मृतदेह तरंगत असल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली. सदर मृतदेह अग्निशमन दलाच्या जवानांनी बाहेर काढून सायन रुग्णालय येथे पाठविला आहे. . मृताची ओळख पटली नसुन त्याचे वय अंदाजे ४५ वर्षे आहे. याबाबतचा अधिक तपास स्थानिक पोलीसांमार्फत सुरु आहे. २) दि. ०३.०७.२०१८ रोजी रात्रौ ९:४६ वा. अग्निशमन नियंत्रण कक्षाकडून प्राप्त माहितीनुसार साई बांगुर्डा तलाव, भांबुर गांव, आरे रोड, पवई या ठिकाणी एक मुलगा तलावात बुडाला होता. दिनांक ०४.०७.२०१८ रोजी सायं ४:४५ च्या सुमारास सदर मुलाचा सदर मुलाचा मृतदेह बाहेर काढून स्थानिक पोलीसांच्या ताब्यात देण्यात आला. मुलाचे नाव सुरज दिलीप सावंत, वय २४ वर्षे असे आहे. याबाबतचा अधिक तपास स्थानिक पोलीसांमार्फत सुरु आहे.